# विठ्ठलसाई साखर कारखान्यातील कर्मचाऱ्यांना सायबर क्राईम विषयी विशेष मार्गदर्शन



मुरूम दि. २ (प्रतिनिधी) – सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा कार्यक्रमांतर्गत नागरिकांना सायबर गुन्हेगारीबद्दल जागरूकता करून या समस्यातून दक्षता बाळगण्यासाठी मुरूम येथील विठ्ठलसाई साखर कारखाना येथे दि.१ सप्टेंबर रोजी

लातूर येथील श्री छत्रपती शाहू महाविद्यालयाची विद्यार्थिनी सहाना विभुते यांनी मार्गदर्शन केले. क्विक हिल फाउंडेशन व महाराष्ट्र सायबर मार्फत लातूरच्या राजर्षी शाहू महाविद्यालयाच्यानवतीने शिक्षा फॉर सायबर सुरक्षा हा उपक्रम विठ्ठलसाई सहकारी साखर कारखान्यात घेण्यात आला. यावेळी कारखान्यातील कर्मचारी, कामगारांना सायबर क्राईम, मोबाईल फ्रौड, वेबसाईट लिंक आणि फेक स्कीमबद्दल जागरुक होण्याबद्दल सहाना विभूते यांनी सविस्तर माहिती दिली. याप्रसंगी कारखान्यातील सर्व विभाग प्रमुख, अधिकारी, कर्मचारी व कामगार उपस्थित होते. या मार्गदर्शनामुळे उपयुक्त माहिती मिळाल्याने उपस्थितांनी समाधान व्यक्त करून आभार मानले.